दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ५५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२६ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल मधील हत्या प्रकरण ; २४ तासात आवळल्या आरोपीच्या मुसक्या

दै.रायगड नगरी । पनवेल

**पनवेल तालुक्यातील खांदेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील आदई गावात एका ३३ वर्षीय महिला रेश्मा सचिन गरुडे यांना जबरी मारहाण करून त्यांची हत्या झाल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी पोलीसांचा तपास सुरू करून आरोपीला २४ तासाच्या आत अटक करण्यात आली आहे.**



खांदेश्वर पोलीस ठाणे हदिदृतील आदईगाव येथील महिला नामे रेश्मा सचिन गरुडे, वय- ३३ वर्षे, रा. आदई, ता. पनवेल या दिनांक २२/०५/२०२२ रोजी चे २२:०० वाजता राहत्या घरातून शतपावली करण्यास जाते म्हणून गेल्या त्या परत न आल्याने दिनांक २३/०५/२०२२ रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात मनुष्य मिसिंग ४३/२०२२ अन्वये दाखल करण्यात आली होती. सदर मिसींग महिलेचा शोध सुरू असताना दिनांक २३/०५/२०२२ रोजीचे २२:०० वा. चे सुमारास गणु पाटील रा. आदई गाव ता. पनवेल, जि. रायगड यांचे जागे मध्ये बांधकाम सुरु असलेल्या चार मजली इमारतीच्या टेरेसवर नमुद महिलेचा मृतदेह मिळुन आला. सदर बाबत अज्ञात इसमा विरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गु.रजि. क्र. १४४/२०२२ भा.दं.वि. कलम ३०२ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

एखाद्या महिलेचा निघृण खुन होणे अशाप्रकारचा गंभिर गुन्हा तात्काळ उघडकिस आणणेबाबत मा. पोलीस आयुक्त सो. बिपीन कुमार सिंह, मा. सह. पोलीस आयुक्त सो. जय जाधव, मा. अपर पोलीस आयुक्त सो (गुन्हे) महेश धुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त सो ( गुन्हे) सुरेश मेंगडे यांनी आदेशीत केले होते. सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुशंगाने मा. सहा.पोलीस आयुक्त सो. (गुन्हे) विनायक वस्त यांचे मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गिरीधर गोरे यांचे नेतृत्वाखाली गुन्हे शाखा कक्ष ०२ चे पथकाने समांतर तपास सुरु केला. सदर गंभिर गुन्ह्याच्या तपासाच्या अनुशंगाने एक पथक तांत्रिक तपासकामी व एक पथक घटनास्थळी भेट देवुन साक्षिदारांकडे तपास करणेकामी तयार करण्यात आले होते. तपासा दरम्यान सदरचा खुन हा इसम नामे जयंत सुरेश कोळखेकर, वय-२५ वर्षे, रा. २०१, अष्टविनायक गृहसंकुल, आदई गाव, ता. पनवेल जि. रायगड यांनी केला असलेबाबत खात्री झाली. संशयित इसमास ताब्यात घेण्याचे अनुशंगाने गुन्हे शाखा कक्ष ०२ चे पथकाने तांत्रिक तपास करून आदईगाव येथे सापळा लावुन नमुद आरोपीस ताब्यात घेतले.

आरोपी कडे सखोल चौकशी केली असता तो मयत महिलेची रिक्षा भाडयाने चालवित असे. त्यांच्यात झालेल्या वैयक्तीक वादातून त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे. गुन्हे शाखा कक्ष ०२, पनवेल, नवी मुंबई चे पथकाने सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासुन न थांबता, अथक परिश्रम करुन २४ तासाचे आत काही एक पुरावा नसताना देखिल आरोपीस अटक करुन गुन्हा उघडकीस आणुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आरोपीस पुढिल कार्यवाहीकामी खांदेश्वर पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असून पुढिल तपास खांदेश्वर पोलीस ठाणे करीत आहेत.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान गुन्हे शाखा कक्ष २ चे वपोनि. गिरीधर गोरे, सपोनि. संदिप गायकवाड, सपोनि. प्रविण फडतरे, पोउपनि. वैभवकुमार रोंगे, पोउपनि. मानसिंग पाटील, पोउपनि. सुदाम पाटील, पोहवा प्रशांत काटकर, पोहवा मधुकर गडगे, पोहवा रणजित पाटील, पोहवा अनिल पाटील, पोहवा ज्ञानेश्वर वाघ, पोहवा राजेश बैकर, पोना निलेश पाटील, पोना अजिनाथ फुंदे, पोना दिपक डोंगरे, पोना इंद्रजित कानु, पोना सचिन म्हात्रे, पोना रूपेश पाटील, पोना प्रफुल्ल मोरे, पोशि प्रविण भोपी यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

# शेनाटे प्रकरणात नवा पेच, अजून दोन आरोपी वाढण्याची शक्यता

दै.रायगड नगरी । तळा

तळा येथील शेनाटे गावाजवळ दिनांक २३.०५.२०२२ रोजी दुपारी साधारण १२.०० वाजण्याच्या सुमारास दिनेश बटावले यांना रिक्षा घेऊन जाताना जबर मारहाण करण्यात आली होती. ते गंभीर जखमी असल्याने त्यांना मुंबई येथे तातडीने हलवण्यात आले होते. मारहाणीमुळे त्यांची तब्येत जास्त खालवल्याने त्यांची मृत्युशी चालली झुंज अपयशी ठरली आणि त्यांचा मुंबईत मृत्यू झाला. यातील एक बाब महत्वाची आहे ती म्हणजे त्यांचा मृत्यू पूर्वीचा मुंबईतील जवाब, त्या जवाबत माझ्यावर चार जणांनी हल्ला केला होता. मी शेनाटे ते तळा असा प्रवास करत असताना चौघानीं म्हणजे गणेश बटावले, भास्कर कारे, रुपेश बटावले आणि राकेश बटावले यांनी माझ्यावर हल्ला केला आणि मला स्मशानाजवळ नेऊन बरीच मारहाण केली. त्यांच्या जवळ असलेल्या लोखंडी रॉड, लाकूड, दगडाने माझ्या डोक्यात, छातीवर, पायावर दुखापत केली. अजून बरीचशी सविस्तर माहिती मारणापूर्वीच्या जवाबत दिनेशने नोंदवली आहे. मात्र प्रत्येक्ष दर्शिने आपल्या जवाबत फक्त दोघांची म्हणजे रुपेश बटावले आणि गणेश बटावले यांचीच नाव तळा पोलीस ठाण्यात जवाबदरम्यान दिली आहेत. सध्या स्थितीत हे दोन्ही आरोपी तळा पोलिसांच्या ताब्यात आहेत.

दिनांक २३.०५.२०२२ रोजी रात्री उशिरा दिनेशचे पार्थिव तळा पोलीस ठाणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर आणण्यात आलं. त्यावेळी ग्रामस्थानी दिनेश च्या मुंबईत दिलेल्या जवाबप्रमाणे चौघानावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. जो पर्यंत उरलेल्या दोघांवर म्हणजे भास्कर कारे आणि राकेश बटावले यांच्यावर गुन्हा दाखल होणार नाही तोवर आम्ही पार्थिवावर अंत्यसंस्कार करणार नाही अशी मागणी करण्यात आली. पोलिसांनी सर्व परिस्थिती पाहता सर्वाना शब्द देत कारवाई करू असे जमलेल्या ग्रामस्थांना सांगितले त्या नंतर दिनेशवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

आता तळा पोलीससमोर दोन जवाबच्या अनुषंगाने आव्हान उभे राहिले आहे. तळा पोलीस उरलेल्या दोन आरोपीवर काय कारवाई करणार आणि दिनेशला कसा न्याय मिळवून देणार या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माणगांवमध्ये चोरट्यांचा धुमाकुळ २ दिवसात ११ घर फोडली

दै.रायगड नगरी । माणगाव

माणगांवमध्ये दोन दिवसात अकरा चोऱ्या झाल्या आहेत. खांदाड, एकता नगर, अमित कॉम्प्लेक्स, आता कुणबी भवन हॉल जवळील विरेश्वर नगर परिसरात चोरी झाल्या आहेत. हे चोरटे रात्रीच्या काळोखाचा फायदा घेत ज्या घरांना लॉक असत अशा घरांमध्ये चोरी करतात. बंद घरे शोधत हे चोरटे चोरी करताना आता उउद्धत मध्ये कैद झाले आहेत.



२४ मे च्या रात्री फोपलूनकर आइस फॅक्टरी बाजूला असणाऱ्या लक्ष्मण कांचन चंद्र बिल्डींगमधील घरात चोरी करायला गेले असता हे चोरटे उउद्धत मध्ये चित्रित झाले आहेत. याच कुणबी भवन हॉल जवळील विभागात हार्मनी कॉम्प्लेक्स सी विंग तसेच तेथीलच एका चाळीतील एक बंद रूम आणि निजामपूर रोड बाजारपेठ येथील तुलसी वृंदावन अपार्टमेंटमधील एक घर फोडण्यात आलं आहे.

चोरट्यांचे एका मागोमाग एक चोरी सत्र सुरूच आहे. बंद घर हेरून हत्याराने कडी कोयंडा तोडून हे चोर घरात असणारे पैसे दागिने यांच्यावर डल्ला मारतात. आधी झालेल्या चोऱ्यांचे पाहिले तरी याच पद्धतीत चोऱ्या झाल्या आहेत. एका शहरात एका मागोमाग एक एवढ्या चोऱ्या तशाच पद्धतीने होत असताना नागरिक मात्र आता चोरट्यांच्या दहशतीखाली दिसत आहेत. एवढ्या चोऱ्या करून देखील पोलिस चोरट्यांना पकडू शकले नसल्याने नागरिकांमध्ये असणारी निराशा नागरिक साफ बोलून दाखवत आहेत. सोशल मिडिया वरती दक्षता म्हणून पोलिस प्रशासना कडून सतर्कतेचे आवाहन केल्याचा मेसेज फिरत आहे.

## संक्षिप्त...

### इर्टिगा कार डिव्हायडरला धडकून उलटल्याने भीषण अपघात, १ जागीच ठार, ४ जखमी

दै.रायगड नगरी । मुंबई

अंबरनाथमध्ये एक भरधाव कार डिव्हायडरला धडकून उलटल्याने भीषण अपघात झाला. या अपघ-ातात कारमधील एकाचा मृत्यू झाला असून चार जण जखमी झाले आ-हेत. याप्रकरणी पोलिसांनी कारच्या चालकाला बेड्या ठोकल्या आहेत.

अंबरनाथच्या कैलास नगर स्मशानभूमीकडून शिवमंदिराकडे जाणाऱ्या नवीन लोकनगरी बायपास रस्त्यावर कारचा भीषण अपघात झाला.

या रस्त्यावरून बुधवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास एका एर्टिगा कारमध्ये ६ जण उल्हासनगरकडे चालले होते. यावेळी या कारने भरधाव वेगात असताना अचानक दुभाजकाला धडक दिली आणि कार उलटली.

यामध्ये चालक सागर चांदवानी याला एअर बॅग उघडल्याने किरकोळ दुखापत झाली. पण गाडीतील इतर ५ जण जखमी झाले. या अपघा-ताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत रिक्षेतून या जखमींना उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात नेलं. मात्र, तिथे अपघाताच्या वेळी चालकाच्या बाजूला बसलेला अनिल पंजाबी याचा मृत्यू झाला. तर संजू कलमचंदानी याला गंभीर इजा असल्यानं त्याला मुंबईच्या रुग्णालयात हलवण्यात आलं.

याव्यतिरिक्त कारमधील बंटी नागदेव, दिनेश दुसेजा आणि दिनेश कासला यांना यामध्ये फारशी इजा झाली नाही. या अपघातानंतर पोलिसांनी चालक सागर चांदवानी यांच्याविरोधात बेदरकारपणे गाडी चालवणे आणि सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करत त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

### रायगड जिल्ह्यामधील आपत्ती व्यवस्थापन आराखडा आणि दरड प्रवण गावांमध्ये

# सुरक्षा कार्यात महिलांचा सहभाग हवा : डॉ. नीलम गोऱ्हे

दै.रायगड नगरी । अलिबाग

येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता संपूर्ण जिल्ह्यामध्ये असलेली दरड प्रवण गावे आणि सातत्याने भूस्खलन होणारे भाग यामध्ये प्रशासनाने बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. अनेक वेळा आपत्ती आल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी काही प्रमाणात आधीच पूर्वतयारी करून ठेवणे आवश्यक आहे. शहरी भागातील नद्यांमध्ये साठलेला गाळ दूर करून शहरी भागात पूर येणार नाही, याची खबरदारी घेण्यात यावी. आपत्तीच्या प्रसंगी बचाव कार्य करताना पुरुषांसोबत महिलांनाही प्रशिक्षण देऊन बचाव कार्यात समाविष्ट करून घेण्यात यावे, अशा सूचना आज विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रायगड जिल्हा प्रशास-नाला केल्या.

आज अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित काळातील उपाययोजना विषयावरील आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस आमदार महेंद्र दळवी, मुंबईच्या माजी महापौर श्रीमती किशोरी पेडणेकर, राज्य महिला आयोगाच्या सदस्या श्रीमती सुप्रदा फातरपेकर, मुंबई महानगरपालिकेतील नगरसेविका शितल म्हात्रे, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपायुक्त शिवराज पाटील, अलिबाग वनसंरक्षक आशिष ठाकरे, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव व विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्या म्हणाल्या, तालुकानिहाय गावांमध्ये रेडिओ स्पीकर सारख्या साधनांचा वापर करून लोकांना पूर्वसूचना देण्यात यावी. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांची मदत घ्यावी. प्रशासन, पोलीस, पोलीस पाटील, ग्रामपंचायत यासोबतच महिला आणि युवकांचा यामधील सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. विविध नद्यांमध्ये गाळ काढण्यासाठी विशेष परवानगी घेण्यासाठी राज्याचे पर्यटन मंत्री नामदार श्री.आदित्यजी ठाकरे यांच्या पुढाकाराने जिल्हा प्रशासनाने केलेली कामे, घेतलेले निर्णय समाधानकारक आहेत. आपत्तीच्या प्रसंगी आपत्तीव्यवस्थापन विभागाकडे विविध जीवनावश्यक साधनांचा समावेश असायला हवा. यामध्ये कर्मचाऱ्यांसाठी पुरेसे गम बूट,



त्याचबरोबर गाळ काढण्यासाठी यंत्र आणि मोठ्या प्रमाणात आवश्यक वस्तूंची यादी तयार ठेवणे याबाबतचे निर्देश आज त्यांनी दिले.

शासनाकडून वादळ आणि पुरामध्ये मिळणारी मदत मागे उरलेल्या एकल महिलांना व्यवस्थित मिळते किंवा नाही तसेच त्याचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत माहिती देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. आरोग्य यंत्रणेकडे असलेल्या रुग्णवाहिका वाहन चालक आणि आवश्यक स्त्री रोग तज्ञ डॉक्टर यासाठी प्रस्ताव देण्याचे त्यांनी सांगितले. ज्या गावांमध्ये यापूर्वी पूर अथवा दरड कोसळली असेल अशा गावांमध्ये लोकांचे पुनर्वसन केलेल्या मोकळ्या जागी सामाजिक वनीकरण करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील एकल महिलांचा पुनर्वसन कामाचा आढावा घेताना महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात मालमत्ता दुकाने शेती आदी स्थावर-जंगम

# चिकणी पुलानजिक रस्त्यावरील खड्डे धोकादायक

## पावसाळा तोंडावर आला तरी सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्षच

दै.रायगड नगरी । कोर्लई



गेल्या अनेक महिन्यांपासून साळाव-मुरुड रस्त्यावर मुरुड चिकणी पूल, निवारा शेड नजिक असलेल्या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे जाणीव पूर्वक दुर्लक्ष दिसून येत असून पावसाळ्यापूर्वी येथील खड्डे बुजविले जातील काय ?असा सवाल वाहन चालक व नागरिकांतून विचारला जात आहे.

साळाव-मुरुड रस्त्यावर अनेक महिन्यांपासून खाच खळगे व खड्ड्यांमुळे रस्त्याची दुरवस्था झाली होती.या रस्त्यावरील खड्डे बुजवून डांबरीकरण व्हावे यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याला विविध सामाजिक संस्था तसेच विविध पक्षांच्या वतीने वारंवार वेळोवेळी निवेदने देण्यात येऊन मागणी करण्यात आली होती. या रस्त्यासाठी सर्व पक्षीय आंदोलन करण्यात आले होते.सन.२०२० मधे आलेले निसर्ग चक्रिवादळ त्यानंतर झालेली वादळ, मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे, पुरामुळे या रस्त्याची पार दुरावस्था झाली होती.

मागील पावसाळ्यात काशिद पूल वाहून गेला होता तसेच चिकणी व विहूर पूल मोठ्या प्रमाणात भराव वाहून गेल्याने धोकादायक झाले होते. या रस्त्यावर मुरुड, विहूर, मोरे,

# राज ठाकरेंचे हिंदुत्व बेसलेस : किशोरी पेडणेकर

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचे हिंदुत्व हे बेसलेस आहे अशी खरमरीत टीका मुंबई महापालिका महापौर किशोरी पेडणेकर यांनी केली. बेणसे येथे किशोरी पेडणेकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी त्यांनी राज ठाकरेंच्या हिंदुत्वावर आपली भूमिका परखडपणे स्पष्ट केली. किशोरी पेडणेकर म्हणाल्या की ध्यास आहे श्वास आहे आणि ह्रदयात राम आणि हातात काम या बाळासाहेबांच्या म्हणण्यानुसार उद्धवजी पुढे चालले आहेत. त्यामुळे ज्यांचा बेस नीट आहे ते योग्य रीतीने ध्यास घेऊन चालले आहेत, तर राज ठाकरेंचे हिंदुत्व हे बेसलेस आहे असे उद्गार मुंबई महापालिकेच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी शिवसंपर्क अभियान दरम्यान काढले आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनेचे शिवसंपर्क अभियान सुरू झालेले आहे. या अभियानाला उदंड प्रतिसाद मिळतोय. आमचे नेते आणि खासदार राजन विचारे, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या विचाराने हे अभियान सुरू झालेले आहे.



उद्धवजीनी सांगितले आहे की आपण सत्तेत असताना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलो पाहिजे, त्यांच्यापर्यंत ज्या योजना शासनाने आखल्या आहेत त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही या ठिकाणी आलो आहोत.

विरोधी पक्षाने आमच्या विरोधात कोंडी अथवा काही करो पण आम्ही महविकास आघाडी च्या माध्यमातून जनतेच्या विकासाची कामे करीत राहणार. विरोधी पक्षाने आमच्या विरोधात चालवलेले राजकारण हे अत्यंत हिन आणि खालच्या दर्जाचे आहे ते संपूर्ण महाराष्ट्र बघत आहे त्यामुळे लवकरच त्याच्यावर पडदा पडेल. असे महापौर पेडणेकर म्हणाल्या. आगामी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत आम्ही आमचे पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे जे आदेश देतील त्यानुसारच काम करणार आहोत..असे सांगून आघाडी व युती बाबत किशोरी पेडणेकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

# निवडणुकांची नांदी

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य निवडणूक आयोगाने मुंबईसह १४ महापालिकांच्या प्रभाग आरक्षण सोडतीचा मुहूर्त ३१ मे रोजी जाहीर केला आहे. महापालिकांमधील कुठले प्रभाग महिला, अनुसूचित जाती, जमातींसाठी राखीव होणार, हे या सोडतीत नक्की होत असते. महापालिकांच्या निवडणुकांकरिता सगळ्यांच राजकीय पक्षांची खऱ्या अर्थाने मोर्चेबांधणी यानंतर सुरू होते; कारण काही प्रभागांमध्ये नव्या उमेदवारांचा शोध आरक्षणावर आधारित घ्यावा लागतो. ते काम आता सुरू होईल; मात्र इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) आरक्षणाविनाच आता १४ महापालिकांच्या निवडणुका होतील असे दिसते. अर्थात, यावरूनही राजकीय आरोप-प्रत्यारोपांची राळ उडेल, यात वाद नाही. ओबीसींची सांख्यिकी देण्यात राज्य सरकारने वेळ काढल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून होतोच आहे. मध्य प्रदेश सरकारला याच प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याची मुभा दिली असल्याने, राज्यातील भाजपच्या आरोपांना तीव्र धार असणार आहे. मध्य प्रदेशच्या मागावर्गीय आयोगाने पाच मे रोजी त्यांच्या राज्यातील ओबीसींबाबतचा पहिला अहवाल राज्याला व राज्याने सर्वोच्च न्यायालयाला दिला. हा अहवाल देतानाच, आयोगाने तो परिपूर्ण नसून त्यात अधिक संशोधन व चौकशीची गरज असल्याचे म्हटले होते. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारलाही त्रिस्तरीय चाचण्या बाकी असल्याने, ओबीसी आरक्षणाविना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश १० मे रोजी दिले; मात्र १२ मे रोजी मध्य प्रदेश मागासवर्गीय आयोगाने तत्काळ दुसरा अहवाल दिला व १४ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने या अहवालातील माहितीच्या विश्लेषणात न जाताच, मध्य प्रदेशाला ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याची मुभा दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या याच निकालाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही मुभा मिळेल, असे अनेक राजकीय पक्षांना वाटत होते. तसे काही होण्यापूर्वीच, राज्य निवडणूक आयोगाने ओबीसीविना आरक्षण सोडत जाहीर केली आहे. आयोगाने मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, नागपूरसह १४ महानगरपालिकांच्या आरक्षण सोडतींचे दिवस जाहीर केल्याने, या निवडणुका आता ओबीसी आरक्षणाशिवायच होणार, असे दिसते आहे. या पूर्वीही पाच जिल्हा परिषदांच्या निवडणुकाही आरक्षणाविना पार पडल्या आहेत. या निवडणुकांमध्ये सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवारी देताना ओबीसींना २७ टक्के प्रतिनिधित्व दिले होते. पूर्वीचे जे ओबीसी मतदारसंघ नव्या अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणानंतर सर्वसाधारण गटात आले असतील, त्याच मतदारसंघांमध्ये हे उमेदवार देण्यात आले. महापालिकांमधील उमेदवार नक्की करताना राज्यातील शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप हे चार प्रमुख पक्ष तरी याच समीकरणाचा अवलंब करतील, असे सध्याचे चित्र आहे. ओबीसींचे राज्यातील तारणहार नक्की कोण, याचा कितीही काथ्याकूट करण्याचा प्रयत्न झाला, तरी तो मुद्दा महापालिकांच्या निवडणुकांमध्ये मध्यवर्ती बनेल, असे वाटत नाही. या निवडणुका म्हणजे राज्य विधानसभेची छोटी चाचणी म्हणावी लागेल; कारण पाचही महसूल विभागांमधील प्रमुख शहरांमध्ये या निवडणुका होणार आहेत. महाराष्ट्र हे सर्वाधिक वेगाने शहरीकरण होणारे राज्य असल्याने शहरांचा कौल नक्की कोणत्या बाजूला आहे, याचे चित्र या निवडणुकांच्या निकालांतून स्पष्ट होणार आहे. पुढील दोन वर्षांमध्ये नक्की कशा प्रकारे काम केले पाहिजे, याचा अंदाज सगळ्यांच पक्षांना यातून येणार आहे. महागाई, नागरी सुविधा, आरोग्य, शिक्षण हे शहरांतील नागरिकांच्या दररोजच्या जगण्यातील प्रश्न आहेत; मात्र गेले बरेच महिने देशाप्रमाणे राज्यातही राजकीय प्रेक्षकांची संख्या खूप वेगाने वाढल्याचा समज करून घेऊन, प्रत्येक पक्षातील वावदूक नेत्यांची अव्याहत पोपटपंची सुरू असते; मात्र गेल्या काही वर्षांमध्ये वाहिन्यांवरील वृत्ते ही केवळ मनोरंजनापुरती मर्यादित असल्याचा जनतेचाही मानस तयार झाल्याने महापालिकांच्या निवडणुकांमध्ये वावदूक नेत्यांनी तयार केलेल्या छद्म सांस्कृतिक प्रश्नांपेक्षा, वर उल्लेखिलेल्या दररोजच्या जगण्यातील प्रश्नांच्या आधारावर जनतेचा कौल मिळण्याचीच शक्यता अधिक आहे. पावसाळ्यात गुडघाभर तुंबणारे पाणी आता केवळ मुंबईपुरतेच मर्यादित राहिले नसून, पुणेकरांनाही तो अनुभव येऊ लागला आहे. उन्हाळ्यात वीजकपातीसोबत पाणीकपातीचा अनुभव आता केवळ दुर्गम खेड्यातील लोकांपुरताच मर्यादित राहिलेला नाही. अरुंद रस्ते, वाहतूक कोंडी, दर्जाहीन आरोग्य व शिक्षण व्यवस्था या सगळ्यांमागे केवळ कर्मचाऱ्यांची अनास्था इतकेच कारण नसून, या शहरांतील सोनेरी झळाळीच्या मागे आकंठ भ्रष्टाचारात बुडालेली संपूर्ण व्यवस्था, हे खरे कारण आहे. ही व्यवस्था बदलण्याची ताकद सर्वसामान्यांच्या मतात असल्याने, त्या सुवर्णसंधीची नांदी या निमित्ताने झाली, तिचे स्वागतच करायला हवे!

# सिडकोचा घनकचरा प्रकल्प की दारुचा अड्डा

**दै.रायगड नगरी । उरण**



सिडकोने द्रोणागिरी नोड परिसरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सेक्टर २ मधिल प्लॉट नं. ९ मध्ये लाखो रुपये खर्च करून घनकचरा व्यवस्थापन केंद्राची उभारणी केली आहे. परंतु सिडकोच्या नाकर्तेपणामुळे आज लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली घनकचरा प्रकल्प धुळखात पडला असून त्या प्रकल्पाचा वापर हा आंबट शौकीनानी दारु पिण्यासाठी केला आहे. त्यामुळे सिडकोचा घनकचरा प्रकल्प की दारुचा अड्डा असा सवाल प्रकल्पग्रस्त, कामगार वर्ग करीत आहेत.

आधुनिक शहराचे शिल्पकार अशी ओळख असलेल्या सिडकोने आप आपले शहर,परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी करोडो रुपये खर्च करून ठिक ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन केंद्राची उभारणी केली आहे. त्याचा एक भाग म्हणून सिडकोच्या अधिकारी वर्गाने उरण मधिल द्रोणागिरी नोड परिसरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सेक्टर २ मधिल प्लॉट नं. ९ मधिल जागेत घनकचरा व्यवस्थापन केंद्राची उभारणी सन २०२१-२२ या वर्षी केली आहे.त्यासाठी सिडकोने लाखो रुपये खर्च ही केले आहेत.

परंतु स्वच्छतेचा बुरखा पांघरून विकासाचा डंका वाजत असलेल्या सिडकोच्या अधिकारी वर्गाने सदर घनकचरा प्रकल्पाकडे दुर्लक्ष केल्याने आज सदर घनकचरा व्यवस्थापन केंद्राची वास्तू धुळखात पडली आहे. त्यामुळे द्रोणागिरी नोड परिसरातील गोळा होणारा कचरा रस्त्यावर टाकून व्यवसायिक, प्रकल्पग्रस्त नागरीक जाळत असल्याचे भयानक चित्र पहावयास मिळत आहे.एकंदरीत सिडकोच्या नाकर्तेपणामुळे आज घनकचरा प्रकल्पाचा वापर हा आंबटशौकीनानी दारुचा आडा बनविण्यासाठी केला आहे.

तरी शासनाची व जनतेची फसवणूक करुन स्वच्छ सर्वेक्षण २०२१-२२ मध्ये सहभागी होणाऱ्या आणि सर्व सामान्य जनतेच्या पैशाची लूट करु पाहणाऱ्या सिडकोच्या एम.डी.कडून अशा विकास कामांसाठी खर्च होणारा निधी वसूल करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी उरण परिसरातील प्रकल्पग्रस्त नागरीक करत आहेत.

## माणगांव नगरपंचायत, माणगांव

**ता.माणगाव, जि.रायगड, पिन नं.४०२१०४ Email-nagarpanchyatmangaon@gmail.com, फोन नं.०२१४०२६३०५६**

जा.क्र./मानपं/जा.नि./२५४/२०२२-२०२३ दि.२५/०५/२०२२

### जाहीर निविदा सूचना

निम्ननिर्देशित कामाकरिता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धतीने सिलबंद निविदा खाली नमूद कालावधीपर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमूद कालावधीपर्यंत लेखी स्वरुपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरुन मिळू शकतील. निविदा फॉर्म करिता माणगांव नगरपंचायत कार्यालयात संपर्क साधावा.

| अ.क्र. | कामाचे नांव | कालावधी | इसारा रक्कम | निविदा विक्रीची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | माणगांव नगरपंचायत विद्युत विभागातील पथदिवे क्लॅम्प पुरवठा व अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे | दि.२६/०५/२०२२ ते दि.०१/०६/२०२२ | १०००/- | १००/- |

वरील निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| मुख्याधिकारी | उपनगराध्यक्ष | नगराध्यक्ष |
| माणगांव नगरपंचायत | माणगांव नगरपंचायत | माणगांव नगरपंचायत |

# शिहू बेणसे विभागात विजेचा लपंडाव सुरूच ; नागरिक प्रचंड त्रस्त

## विजवितरण विरोधात जनतेत संतापाची लाट, तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पावसाळा सुरू होण्यापूर्वीच विजवीतरण विभागाकडून जनतेला वेठीस धरले जातेय. रोज रात्री विजबत्ती गुल होत असल्याने शिहू बेणसे विभागातील जनता प्रचंड त्रासलीय. तर विजवितरण विभागाच्या विरोधात जनमानसातून असंतोषाची लाट उफाळून आलीय. सहनशीलतेचा अंत पाहू नका, असा जनमाणसातून संताप व्यक्त होतोय.



शिहू बेणसे परिसरासह अन्य भागात विजेचा लपंडाव काही केल्या थांबेना. रात्री मच्छर रक्त पितायेत याबरोबरच उन्हाळ्यात उष्म्याने अंगाची ला-हीलाही होतेय,येथील नागरिक पुरते त्रस्त झालेत. विजेचा लपंडाव थांबवा, वीजपुरवठा सुरळीत करा, सहनशीलतेचा अंत पाहू नका, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा संताप महिला वर्ग व तरुणाईतून व्यक्त होत आहे. पावसाळ्यात वीज पुरवठा खंडीत होणे नित्याचेच, मात्र सध्या उन्हाळ्याचे दिवस असून ही कधी दिवसा तर कधी रात्री विजबत्ती गुल होते. विजेच्या लपंडावाने नागरिक , बालबच्चे वृद्ध सारेच बेजार झाले आहेत. लहान मुले रात्रभर रडत आहेत, रुग्ण देखील त्रासले आहेत. खंडित झालेला वीजपुरवठा केव्हा पूर्ववत होईल याचा अंदाज येत नसल्याने नागरिक सतत चिंतेत असतात. विजवीतरण अधिकारी व कर्मचारी मात्र मंद गतीने पाऊले टाकताना दिसत आहेत. विजबत्ती गुल झाल्यावर कर्मचारी नॉटरीचेबल होतायत. विजवीतरण कर्मचाऱ्यांची कार्य तत्परता दिसून येत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. आजमितीस रोजच विजबत्ती गुल होत असल्याने रात्री अंधारात अधिक भीती वाढली आहे.

शहू बेणसे विभागातील जनतेला वर्षातील बाराही महिने विजसमस्येला सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्र राज्य विद्धुत विज वितरण मर्यादित कंपनी अंतर्गत शिहू बेणसे विभागात अनेक गावे व आदिवासींवाड्यापाड्याना विद्युत पुरवठा केला जातो. मात्र आजमितीस सातत्याने विजेचा लपंडाव सुरूच असून विद्धुत देयके मात्र आवाक्याच्या बाहेर येत असल्याने सर्वसामान्य गोरगरीब जनतेतून संताप व्यक्त केला जात आहे. सतत विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने ऐन पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वीजपुरवठा खंडित होताच बँकांचे व्यवहार ठप्प होत आहेत, नेटवर्क सेवा बंद पडत आहे. इंटरनेट सुविधेशी संबंधित सर्व शासकीय निमशासकीय कामे बंद होत आहेत. याठिकाणी कधी सलग तीन चार दिवस तसेच अनेकदा दहा दिवसही वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांतून वीजवितरण च्या भोंगळ कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

# प्रकल्पग्रस्त संघटना भेंडखळ तर्फे कै.रोहिदास घरत यांच्या पुण्यतिथी निमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

भेंडखळ येथे कै.रोहिदास महादेव घरत यांच्या प्रथम पुण्यस्मरण प्रित्यर्थ प्रकल्पग्रस्त संघटना भेंडखळ मार्फत प्राथमिक शाळा भेंडखळ येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कै.रोहिदास घरत यांच्या कामगार व सामाजिक क्षेत्रातील कामांचा यावेळेस गुणगौरव सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणात केला. त्यांच्या पश्चात त्यांचं सामाजिक व प्रकल्पग्रस्तांसाठीच कार्य पुढे नेणार असल्याचे यावेळी प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष अनिल अशोक ठाकूर यांनी सांगितले.

यावेळी या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले पालवी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष परशुराम भोईर, चंद्रविलास घरत, सामाजिक कार्यकर्ते नासिकेत म्हात्रे यांनी कै. रोहिदास घरत यांच्या सामाजिक व कामगार क्षेत्रातील कार्याबद्दल विस्तृतपणे आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात कै.रोहिदास घरत यांच्या पत्नी श्रीमती हर्षदा घरत व त्यांच्या दोन्ही मुली यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर, विकास सर, सर्व शिक्षक वर्ग, भेंडखळ गावचे माजी सरपंच मनोज भगत, माजी उपसरपंच मिलिंद पाटील, योगेश भगत, प्रकल्पग्रस्त संघटनेतर्फे अनिल ठाकूर, लिलेश्वर भगत, निलेश पाटील, शक्ती पाटील, अक्षय भोईर, संदिप म्हात्रे, रूण्मय म्हात्रे, प्रशांत पाटील, किरण घरत, सचिन पाटील तर सामाजिक कार्यकर्ते रविंद्र पाटील, कविश ठाकूर, अमेश ठाकूर, प्रांजल भोईर, संतोष पाटील, दर्शन पाटील, ओंकार पाटील, अदित्य पाटील, स्वप्नील घरत,उमेश ठाकूर, महेश भोईर, अशोक ठाकूर व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### कागदपत्रे हरविलेबाबत

अब्दुल हमीद कादरशा, राठी :- सी/२५, सारनाथ, अणुशक्तीनगर मुंबई यांचेकडून ट्रॉम्बे, मुंबई, अणशुक्तीनगर आवारात अब्दुल हमीद कादरशा यांच्या नावे असलेले त्रिमुर्ती अंगण को.ऑप.हौसिंग सोसायटी, रुम नं.अे-३०३, प्लॉट नंबर ५०, सेक्टर २०, कामोठे, नवी मुंबईचे शेअर सर्टीफिकेट क्रं.१३, (भाग ६१ ते ६५) हरविले आहे. त्याबाबत ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई येथे प्रॉपर्टी मिसिंग रजि नं.३०४/२०२१ दि.०४/०३/२०२१ रोजी नोंद केली आहे.

सदर कागदपत्रे जर कुणाला सापडली असल्यास त्रिमुर्ती अंगण को.ऑप. हौसिंग सोसायटी, रुम नं.अे/३०३, प्लॉट नंबर ५०, सेक्टर २०, कामोठे, नवी मुंबई या पत्यावर आणून द्यावीत अथवा ९९६९०३८०४६ या नंबरवर संपर्क साधावा.

### कागदपत्रे हरविलेबाबत

अब्दुल हमीद कादरशा, पत्ता : त्रिमुर्ती अंगण को.ऑप.हौसिंग सोसायटी, रुम नं.अे/३०३, प्लॉट नंबर ५०, सेक्टर २०, कामोठे, नवी मुंबई यांचेकडून ट्रॉम्बे, मुंबई, अणुशक्तीनगर आवारात अब्दुल हमीद कादरशा यांच्या नावे असलेले त्रिमुर्ती अंगण को.ऑप.हौसिंग सोसायटीचे शेअर सर्टीफिकेट क्रं.१३, (भाग ६१ ते ६५) हरविले आहे. त्याबाबत ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई येथे प्रॉपर्टी मिसिंग रजि नं.३०४/२०२१ दि.०४/०३/२०२१ रोजी नोंद केली असून अब्दुल हमीद कादरशा यांनी डुप्लिकेट सर्टीफिकेट मिळण्याबाबत सोसायटीकडे अर्ज केला आहे.

अब्दुल हमीद कादरशा यांना डुप्लिकेट सर्टीफिकेट देण्याबाबत जर कुणाला काही हरकत असल्यास सदर व्यक्तीने ही जाहिरात दिल्यापासून १५ दिवसांच्या आत त्रिमुर्ती आंगण को.ऑप.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.५०, सेक्टर २०, कामोठे, नवी मुंबई यांना आपली हरकत लेखी स्वरुपात कळवावी.

**सही/-**
**त्रिमुर्ती आंगण को.ऑप.हौसिंग सोसायटी तर्फे**
**श्री.झुंजार डोलकर (सचिव) ९८२०५११४५६**
**श्री.शरफुद्दीन शेख (अध्यक्ष) ९३२१५२१७३५**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सुरक्षा कार्यात महिलांचा सहभाग हवा : डॉ. नीलम गोऱ्हे

मालमत्ता महिलांचे नावे करण्याबाबतची प्रक्रिया करावी. समुद्र किनारी राहणाऱ्या महिलांसाठी मच्छी व्यवसाय व त्यावर आधारित पूरक व्यवसायासाठी विविध महामंडळांच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात यावा. शेतकरी महिलांना मोफत खते बी-बियाणे देण्यात यावे. अल्पवयीन मुलींचे बालविवाह रोखण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी. तसेच परिवहन विभागाने महिलांसाठी ऑटोरिक्षा मिळवून देण्याबाबत शिबिरे घ्यावीत. येत्या १५ ऑगस्ट पर्यंत त्यांना रिक्षा मिळतील याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना केल्या.

रायगड जिल्हा स्तरावर एकल महिलांसाठी एक विशेष समिती स्थापन करून त्याद्वारे महिलांच्या विकासाची योजना तयार करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

यावेळी विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेल्या सूचनेचे तात्काळ पालन करीत जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यातील महिलांच्या नावे त्यांच्या पतीच्या नावे असलेल्या मालमत्ता आणि जमीन हस्तांतरित करण्याबाबतचे परिपत्रक या बैठकीनंतर त्वरित काढले. याबद्दल डॉ. गोऱ्हे यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले. त्याचबरोबर येत्या आठवड्यामध्ये कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे कोकणातील विविध प्रश्नांवर बैठक घेणार असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

या बैठकीनंतर जिल्ह्यातील एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी या महिलांसोबत संवाद साधून विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन उपसभापती डॉ.गोऱ्हे यांनी केले आहे.

## चिकणी पुलानजिक रस्त्यावरील खड्डे धोकादायक

मजगांव, दांडा, सर्वे ठिकाणी रस्त्याची कामे करण्यात आली. यंदा साळाव-मुरुड रस्त्यावरील अर्धवट कामे पूर्ण होणे अपेक्षित होते.परंतु तसे झाले नाही. अद्यापही या रस्त्यावर चिकणी, काशिद यू-टर्न, बोर्ली-मांडला व कोर्लई भागात रस्त्यावर खड्ड्यांमुळे तसेच चिकणी पूल रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहन चालक व प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागत असून शासनाच्या संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याने यात लक्ष पुरवून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

## ग्रामपंचायत आकुर्ली

### मु.आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांनी निविदा २६/०५/२०२२ ते २९/०५/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास दि.३०/०५/२०२२ सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | वासुदेव शेळके ते हनुमान मंदिर पर्यंत पाईप गटार व सिमेंट काँक्रीटीकरण करणे. (१५ वा वित्त आयोग) | ५१९००० | ५१९० | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |
| २ | हनुमान मंदिर माळीवाडी जवळ चेंबर व पी.सी.सी. व सिमेंट काँक्रिट रस्ता करणे (ग्रामनिधी) | ३००००० | ३००० | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |
| ३ | प्रभाकर ठाकूर ते नामा म्हात्रे पर्यंत गटार दुरुस्ती व पी.सी.सी.करणे (ग्रामनिधी) | ४९९४९७ | ४९९४ | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |
| ४ | राजेश धरणेकर ते लक्ष्मण धरणेकर पर्यंत पाईप गटार करणे (ग्रामनिधी) | ३००००० | ३००० | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |
| ५ | राजेश ठाकूर यांच्या बिल्डींग समोर नाला साफसफाई करणे. (ग्रामनिधी) | २४५०० | २४५ | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |
| ६ | भाऊ पाटील ते किसन पाटील पर्यंत नाला साफसफाई करणे. (ग्रामनिधी) | २४५०० | २४५ | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |
| ७ | अपेक्षा कॉम्प्लेक्स समोर नाला साफसफाई करणे. (ग्रामनिधी) | २४५०० | २४५ | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |
| ८ | पनवेल पॅराडाईज बिल्डींगच्या पाठी गटार साफसफाई करणे. (ग्रामनिधी) | २४५०० | २४५ | २६/०५/२०२२ | २९/०५/२०२२ |

| अ.क्र. | वस्तू / साहित्याचे नाव | लेखाशिर्षक | सन | नग |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत आकुर्ली हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी बसण्यासाठी बेंच खरेदी करणे | ग्रामनिधी १५% खर्चातून | २०२२/२०२३ | दर पत्रक सादर करणे |

अटी / शर्ती

१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२) इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल.
३) निविदा किंमत नापरतावा समजावी.
४) नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
६) निविदा मंजूर केल्यास रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
७) ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८) इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसाने कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९) वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झालयास व दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
१०) वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

| सही/- | सही/- |
|---|---|
| सौ.भारती सचिन पाटील | श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे |
| सरपंच | ग्रामसेवक |
| ग्रामपंचायत आकुर्ली | ग्रामपंचायत आकुर्ली |
| ता.पनवेल, जि.रायगड | ता.पनवेल, जि.रायगड |

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# कर्जत तालुका काँग्रेस अध्यक्षपदी शिवाजी खारीक, शहराध्यक्षपदी अनंत देवळे




**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक निवडणूका नुकत्याच पार पडल्या. या निवडणुकांमध्ये तालुकाध्यक्ष असलेल्या मुकेश सुर्वे यांना बढती देऊन प्रदेश प्रतिनिधी म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर तालुकाध्यक्षपदी शिवाजी खारीक, वरिष्ठ उपाध्यक्षपदी अरविंद कटारिया तर कर्जत शहराध्यक्षपदी अनंत देवळे यांची निवड करण्यात आली. या निवडणूका खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.

येथील आंबामाता मंदिराच्या सभागृहात काँग्रेस पक्षांच्या संघटनात्मक निवडणुकांचे आयोजन करण्यात आले होते. निरीक्षक म्हणून विजय ओव्हाळ हे उपस्थित होते. त्यांच्या सह जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अकलाक शिलोत्री, धनंजय चाचड, प्रमोद राईलकर, दत्तात्रेय सुपे, लक्ष्मण ऐनकर हिराचंद जाधव आदी उपस्थित होते.

तालुकाध्यक्ष मुकेश सुर्वे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात सभेचा उद्देश सांगितला. त्यांनतर महेंद्र घरत यांनी आपल्या मनोगतात, 'कर्जतमध्ये काँग्रेसचे कार्यकर्ते खूप आहेत मात्र त्यांना एकत्रित करण्यासाठी आपण सर्वांनी मेहनत घेणे गरजेचे आहे. आगामी निवडणुकीत आपले उमेदवार तयार ठेवा तसेच एकेकाळी बालेकिल्ला असलेल्या कर्जत तालुक्यातून काँग्रेसचा उमेदवार निवडणुकीत असलाच पाहिजे असा निर्धार करा.' असे स्पष्ट करून आज होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेनंतर सर्व मतभेद बाजूला ठेऊन सर्वांनी कामाला लागा' असे आवाहन केले.

त्यानंतर निरीक्षक ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया सुरू झाली. प्रदेश प्रतिनिधी म्हणून मावळते तालुकाध्यक्ष मुकेश सुर्वे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांनी आपले राजीनामा पत्र जिल्हाध्यक्ष घरत यांच्याकडे सुपूर्द केले मात्र एक व्यक्ती, एक कुटुंब, एक पद या काँग्रेसच्या धोरणामुळे त्यांचे पद आपोआपच रिक्त झाल्याने त्यांचा राजीनामा स्वीकारला नाही. त्यानंतर जिल्हा प्रतिनिधींची निवड करण्यात आली. यामध्ये सहा सदस्य निवडण्यात आले. तालुकाध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या वेळी माजी तालुकाध्यक्ष शिवाजी खारीक आणि नेरळचे अरविंद कटारिया यांनी आपली इच्छा प्रकट केली. अखेर ओव्हाळ आणि घरत यांनी दोघांशी चर्चा करून अध्यक्ष म्हणून खारीक व वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कटारिया यांची निवड केल्याचे जाहीर केले. कर्जत शहर अध्यक्षपदी अनंत देवळे तर महिला शहर अध्यक्षपदी सुप्रिया देशमुख यांची निवड जाहीर करण्यात आली. ओव्हाळ यांनी 'तालुक्यात फिरून काँग्रेस कार्यकर्त्यांशी संपर्क करून त्यांना आपल्या प्रवाहात सामावून घ्या.' असे सूचित केले. नवनियुक्त जिल्हा प्रतिनिधी चंद्रकांत मांडे यांनी कार्यकर्त्यांना होणाऱ्या त्रासाबद्दल खंत व्यक्त केली.

याप्रसंगी दीनानाथ देशमुख, आवेश जुवरी, हेमंत देशमुख, सुरेश चंचे, सुभाष मदन, संदीप पाटील, गोपीनाथ देशमुख, संदीप सोनटक्के, यतीन यादव, संतोष पेडमकर, बळीराम कोळंबे, मंगल माळी, यश सुर्वे, ललिता चंदने, पूनम मुसळे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दस्तुरी ते पांडे रोडचे शासन निर्णयानुसार क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी व्यापारी संघटनेचे प्रशासकांना निवेदन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानच्या पर्यटनाला घातक असणाऱ्या आणि माथेरानची प्रतिमा मलिन करणाऱ्या काही शक्तींना सोबत घेऊन एकप्रकारे बालिश बुद्धीने स्वतः चाच स्वार्थ साधण्यासाठी नेहमीच तत्पर असणाऱ्या येथील काही मंडळींनी होणाऱ्या विकास कामांच्या विरोधात जाऊन होणारी महत्वाकांक्षी कामे पूर्ण होऊ नयेत यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे

त्यामुळे शासनाने धुळविरहित रस्त्याला पूरक अशा क्ले पेव्हर रस्त्यांना मान्यता दिलेली असताना काही भागातील क्ले पेव्हर ब्लॉक काढण्याचे षडयंत्र रचले जात आहे यामुळे आगामी काळात धूळ विरहीत रस्त्याना जाणूनबुजून आवाहन केले जात आहे.

याकामी दस्तुरी ते पांडे रोडचे शासन निर्णयानुसार क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी येथील व्यापारी संघटनेने नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांच्या कार्यालयात जाऊन आज दि.२५ रोजी समस्त व्यापारी शिष्टमंडळाने लेखी निवेदन दिले आहे.या निवेदनाची एक प्रत एमएमआरडीए चे कार्यकारी अभियंता अरविंद धाबे यांनाही पाठविण्यात आली आहे.

यावेळी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी, यतीश तावडे, ज्ञानेश्वर बागडे, शिवाजी शिंदे, नितीन शहा, मंगेश शिंदे, जनार्दन पार्टे, सुनील शिंदे, भास्कर शिंदे, नितेश कदम, कुलदीप जाधव, फझल महापुळे, शैलेश भोसले, निखिल शिंदे, दीपक शहा, शकील पटेल, प्रमोद नायक, विश्वास वैद्य, शफीक बढाणे, दिनेश सुतार, गिरीश पवार, सिद्दीक पाववाले यांसह अन्य व्यापारी मोठया संख्येने उपस्थित होते.

एमएमआरडीए च्या माध्यमातून होणारी ही क्ले पेव्हर ब्लॉक रस्त्याची कामे लवकरच पूर्ण करून घ्यावीत जेणेकरून दस्तुरी ते पांडे रोड हा संपूर्ण धूळ विरहीत रस्ता तयार होईल याबाबत शेकापचे अध्यक्ष शफीक बढाने यांनी सुध्दा यावेळी प्रशासकांना निवेदन सादर केले आहे.



आम्ही व्यापारी म्हणून आम्हास मुख्य रस्ता धुळविरहीत हवा, शासनाने जो निधी दिला आहे एमएमआरडी मार्फत सुनियोजित रस्ता आहे दस्तुरी ते छत्रपती शिवाजी महाराज रोड हा सर्व परवानगी सहित मान्य झाला आहे, त्या मुळे इतके वर्ष आम्ही जी लिद मिश्रित धूळ श्वासाद्वारे खात होतो व ज्यामुळे आमच्या मालाची धुळीमुळे मोठया प्रमाणावर नुकसान होत होते त्यातून आम्हास मुक्तता मिळेल अपेक्षा ठेऊन होतो पण केवळ स्वार्थी हेतूने त्यास आडकाठी आणून आम्हास वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे, आज मितीस आम्ही व्यापारी कदापि हि दुसऱ्यांच्या व्यवसायची बदनामी किंवा हानी होईल अशी वल्गना केली नाही, आम्ही व्यापारी नेहमी सोशिक जीवन जगत राहतो इतर व्यवसायिक यांच्या व्यवसायात कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप केला नाही पण याच्या विरोधात दस्तूरी येथे फसवणूक, तसेच खोट्या माहिती देऊन आपल्या पर्यटन विकास आणि व्यवसाय ला उत्तरती कळा लावली जात आहे आणि शासनास अन्य माथेरान प्रेमी यांना स्वतः च्या दिन कारुण्य कहाण्या सांगून आपल्या पदरात जे हवे ते पाडून घ्यावयाचे आणि स्वार्थ साधायचा हि पद्धत वापरली जाऊन यामध्ये भले गावाची विल्हेवाट लागली तरी चालेल अशी प्रवृत्ती सध्या सुरू आहे. आमची एकच रास्त मागणी आहे की म.गांधी रोड हा धुळविरहित बनला पाहिजे, आम्ही सुधा आंदोलन करू शकतो हे दाखवून द्यावे लागेल.

**ज्ञानेश्वर बागडे, व्यापारी माथेरान**

रस्त्यांच्या संदर्भात दिलेल्या सर्व निवेदनावर सनियंत्रण समिती सोबत चर्चा करणार आहोत. रस्त्याच्या बाबतीत जे कोणी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करेल त्यांच्यावर नक्कीच कारवाई करण्यात येईल.

**सुरेखा भणगे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद**

# मच्छी विक्रेत्या महिलेची लूट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ठाण्यातून मच्छी विक्री करुन सीबीडीतील दिवाळे गावात परतणाऱ्या मच्छी विक्रेत्या महिलेच्या गळ्यातील ८२ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात लुटारुने लुटून पलायन केल्याची घटना सीबीडी बेलापूर रेल्वे स्टेशनच्या सबवे मध्ये घडली. पनवेल रेल्वे पोलिसांनी या लुटारु विरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

सदर घटनेतील तक्रारदार मिना महादेव कोळी (५४) या सीबीडी बेलापूर येथील दिवाळे गावात राहण्यास असून त्यांचा मच्छी विक्रीचा व्यवसाय आहे. मिना कोळी या नेहमीप्रमाणे ठाणे येथे मच्छी विक्री करण्यासाठी गेल्या होत्या. त्यानंतर त्या ठाणे येथून लोकलने सीबीडी–बेलापूर रेल्वे स्थानकावर उतरल्यानंतर डोक्यावर मच्छीची पाटी आणि हातात बास्केट घेऊन दिवाळे गाव येथे जाण्यासाठी सबवे तून खाली उतरत होत्या. याचवेळी पाठीमागून आलेल्या अज्ञात लुटारुने मिना कोळी यांच्या गळ्यातील १ तोळे ७५० ग्रॅम वजनाचे ८२ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून रेल्वे स्टेशनवर पलायन केले. त्यामुळे मिना कोळी यांनी देखील सदर लुटारुच्या पाठीमागे धाव घेतली.

मात्र, सदर लुटारु लोकल गाडीत चढून दुसऱ्या फलाटावर उतरुन पळून गेला. त्यामुळे मीना कोळी यांनी दुसऱ्या लोकलने सीवुडस् रेल्वे स्टेशनवर जाऊन लुटारुचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो त्यांना सापडला नाही. त्यानंतर त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात लुटारु विरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरु केला आहे.

## जाहीर नोटीस

ज्याअर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली सही करणार मेसर्स कमर्शियल अ‍ॅण्ड इंडस्ट्रीयल सर्व्हीस इंटरप्रायझेस (COINSECO) चे प्रो.प्रा.श्री.अब्दुलाही इस्माईल शेख यांनी द वेअरहाऊसिंग (डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड रेग्युलेशन) अ‍ॅक्ट २००७ चे कलम १० उप कलम ६ अन्वये खाली नमूद केलेले मालक यांना मागणी नोटीस बजावली होती. सदर मालक यांनी सदर खाली वर्णन केलेली रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषतः मालक आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांचे वेअरहाऊस / यार्ड मध्ये खाली वर्णन केलेली मालमत्ता मे २०१५ पासून दरमहा लायसेन्स फी च्या मोबदल्यात ठेवण्यात आली आहे व ती आजपर्यंत प्रत्यक्षरित्या खाली सही करणार यांचे वेअरहाऊस / यार्ड मध्ये आहे. परंतु सदर मालक यांनी सदर लायसेन्स फी व त्यावरील दंडाची खाली नमूद केलेली रक्कम सदर खाली सही करणार यांना अदा केलेली नाही. वरील उल्लेख केलेल्या अ‍ॅक्टचे कलम १० उप कलम ५ अन्वयेचे अंमलबजावणी अंतर्गत मालमत्ता विक्री करिता जाहीर लिलाव विक्री सुचना / नोटीस मालक आणि सर्वसाधारण जनता यांना देण्यात येत आहे. सदर मालमत्तेची लिलाव विक्री खाली नमूद केले मालक यांनचे लायसेन्स फी व दंडाची रक्कमेच्या वसुलीकरिता खाली नमूद केलेल्या संबंधित तारखेच्या दिवशी ''जसे आहे जे काही आहे'', ''जसे आहे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्वावर विक्री करण्याचे ठरविले आहे. सदर मालमत्तेची राखीव किंमत, इसारा ठेव व अन्य तपशिल खालीलप्रमाणे :–

| अ. क्र. | मालकाचे नाव | मालमत्तेचे नाव | मालमत्तेचे वर्णन | | ताब्याची तारीख | मागणी नोटीसची तारीख व मागणी नोटीसनुसार थकीत रक्कम (रु.) | लिलावाची तारीख व वेळ | राखीव किंमत (रु.) | इसारा किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेसर्स साहिल फ्रेट एक्सप्रेस प्रा.लि. तर्फे व्यवस्थापकीय संचालक, श्री.सुहैल शेख | Axle Vechicle with choose Neck | निर्मात्याचे नाव | Scheuerle | मे २०१५ | दि.१०/०५/२०२२ व रु.३३,७९,०८०/– | दि.०९/०६/२०२२ स.११.00 ते दु.२.00 | रु.३३,७९,०८०/– | रु.३,३७,९०८/– |
| | | | चेसी नं. | W09899XX95PS17031 | | | | | |
| | | | निर्मिती वर्ष | 2005 | | | | | |
| २ | मेसर्स साहिल फ्रेट एक्सप्रेस प्रा.लि. तर्फे व्यवस्थापकीय संचालक श्री.सुहैल शेख | Axle Vechicle | निर्मात्याचे नाव | Scheuerle | | | | | |
| | | | चेसी नं. | W09827620WPS17031 | | | | | |
| | | | निर्मिती वर्ष | 1998 | | | | | |
| ३ | मेसर्स साहिल फ्रेट एक्सप्रेस प्रा.लि.तर्फे व्यवस्थापकीय संचालक, श्री.सुहैल शेख | 20 feet Container | | ------ | | | | | |

सदर विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटी करिता, मालमत्तेची पाहणी करिता किंवा मालमत्तेबाबत कोणतीही अडचण व शंका असल्यास कृपया खालील दिलेल्या पत्यावर किंवा संबंधित अधिकारी श्री.अब्दुल रेहमान शेख, मो.९७६८३५५२३१ यांना संपर्क साधावा. वरील लिलाव विक्रीच्या तारखेपूर्वी वरील मालक यांनी कोणत्याही वेळेत परतफेड केली गेल्यास आमच्याकडून मालमत्तेची विक्री किंवा हस्तांतरण केले जाणार नाही.

सदर मालक यांनी वरील नोटीस प्रसिद्ध झाल्याचे १४ दिवसांच्या आत सदर रक्कम अदा करण्यात यावी अन्यथा द वेअरहाऊसिंग (डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड रेगुलेशन) अ‍ॅक्टर २००७ चे कलम १० उपकलम ६ अन्वये नोटीस समजण्यात यवी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०५/२०२२

**सही/–**
**मेसर्स कमर्शियल अ‍ॅण्ड इंडस्ट्रीयल सर्व्हीस इंटरप्रायझेस (COINSECO) चे प्रो.प्रा.श्री.अब्दुलाही इस्माईल शेख**
**ऑफिस व वेअरहाऊस पत्ता : सर्व्हे व हिस्सा नं.११६/२+३ब, वावंजे रोड, शिव मंदिराजवळ, मु.पो.वावंजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०८**

# पनवेल महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## ''नागरिकांना जाहीर आवाहन''

दि.२५/०५/२०२२

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहरामध्ये दि.१०/०२/२०२२ रोजी पासून जलकुभ निहाय आठवड्यातून एका भागाचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. परंतु सद्यस्थितीत देहरंग धरणाची पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे पनवेल शहरामध्ये शनिवार दि.२८/०५/२०२२ रोजी पासून ते देहरंग धरणात मुबलक पाणी साठा होईपर्यंत झोन निहाय एकदिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :–

खालील भागात दि.२८/०५/२०२२ रोजी पासून एक दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येईल.

### झोन क्र.१ मधील भाग पुढील प्रमाणे

**१) पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा** :

कोळीवाडा, पांजरपोळ, वाणी आळी, धोबी आळी, मिरची गल्ली, कुंभारवाडा (अर्धा) मेवाड हॉटेल ते टपाल नाका भारत नगर झोपडपट्टी, पटेल मोहल्ला, सत्कार बेकरी ते कछवा प्लाझा, अप्सरा लॉन्ड्री ते मुस्लीम नाका, भुसार मोहल्ला, कुंभारवाडा (अर्धा), धोबी आळी, पाडा मोहल्ला, कच्छी मोहल्ला, पाटकर वाडा, आदिल टॉवर ते वाली अपार्टमेंट, ख्वाजानगरी झोपडपट्टी बंदर रोड, कोर्ट ते प्रेस्टीज गार्डन (साई नगर) आदर्श सोसायटी, किनारा सोसायटी ते स्वामी नारायण मंदिरापर्यंत इत्यादी.

**२) सर्व्हीस हौद नवीन उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा** :

मिडल क्लास सोसायटी भाग १, आमदार निवास गल्ली प्लॉट नं.११ ते आशापूरी सोसायटी पर्यंत, विश्राळी तलाव झोडपट्टी, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेल पेट्रोलपंप पर्यंत, विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल, मिडल क्लास सोसायटी भाग २, गांधी हॉस्पिटल ते जे.जे.वुड पर्यंत, बार्नस हायस्कूल ते प्लॉट नं.१४ (रायगड बँक) प्लॉट नं.६४ ते श्रवरजंली सोसायटी (एम.टी.एन.एल.च्या मागील गल्लीपर्यंत) प्लॉट नं.३६ ते रुपाली टॉकिज पर्यंत काशीबाई झोपडपट्टी, बालाजी सोसायटी, निळकंठ दर्शन, देव गौरव लिलामाधव, पपनवेल पॅलेस, ओरियन मॉल इत्यादी.

**३) गंगाराम टॉकीज उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा** :

तक्का गाव संपूर्ण, प्रजापती, कावेरी, सुर्य गेस्ट हाऊस, एन.के.हेरिटेज, रिद्धी सिद्धी, निल सिद्धी गार्डन, इडन गार्डन, गोदरेज, नवनाथ मंदिर झोपडपट्टी, आझाद नगर झोपडपट्टी, सारंग लॉज ते साई मंदिर, संपूर्ण पोदी, कस्तुरी ABC सोसायटी, कस्तुरी AA, BB, कस्तुरी EFG, नॅशनल प्लाझा, नॅशनल रेसिडेन्सी, नॅशनल गार्डन, मोराज छोटा गेट, नॅशनल पॅराडाईज, नॅशनल ABC कॉस्मो, मोराज M.A., मोराज गंगा, जमुना, मोराज गंगोत्री, एस.के.बजाज, बालाजी आंगण, निरज माधव, निळकंठ दर्शन, साळवी रेसिडेन्सी, नॅशनल D विंग, कॉस्मो पॉलिटीन सोसायटी, नॅशनल पॅलेस ABC, एम एस ई बी कॉलनी, कांडपिळे रेसिडेन्सी, नॅशनल पॅलेस नवीन लाईन, गोदरेज, मोराज MA-1, To MA-4, मोराज T1, T2, T3, T4, मोराज S1, S2, S3, S4, मोराज T5, T6, T7, मोराज R1, R2, R3, मोराज R4, R5, R6, मोराज PN Type मोराज तापी, नर्मदा, मोराज L4, L5, मोराज

**४) मार्केट यार्ड उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा** :

उरण रोड ते शंकर मंदिर कोळीवाडा, उरण रोड ते ताज सोडा फॅक्टरी, बागवान मोहल्ला, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते वसंत आलाप सोसायटी, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते साई प्रतिक सोसायटी, मार्केट यार्ड परिसर, वैभव हॉटेल, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते हीबा सोसायटी, रजदा सोसायटी, मुल्ला हमीद मंजिल सोसायटी, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते गुरुशरणम, रॉयल रेसिडेन्सी सोसायटी मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते पारिजात सोसायटी गुलमोहर, गुलिस्तान सोसायटी, पंचमुखी, फ्युचर हाईट, चिन्मय गौरांग सोसायटी, गोविंद धाम, तिरुपती ए.एम.एस. हेरिटेज सोसायटी, मार्केट यार्ड उंच जलकुंभ ते लिखिते हॉस्पिटल परिसर इत्यादी.

### झोन क्र.२ मधील भाग पुढीलप्रमाणे

**१) सर्व्हीस हौद जुने चौकोनी जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा** :

माणिक नगर, स्नेहसदन सोसा., यशोदिप सोसा, पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय, जैन मंदिर पासून भुसार मोहल्ला बैठी घर, पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रॉनिक पर्यंत, कोहिनूर टेक्निकल ते नवनाथ मंदिरापर्यंत, लक्ष्मीवसाहत, शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरी पर्यंत, अशोका गार्डन सोसा., मेवाड हॉटेल ते मशिद पर्यंत, अर्बन बँक ते साई पार्क, अर्बन बँक ते गणपती मंदिर परिसर, श्री गांगल यांच्या घरपर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत घाटे आळी, गावदेवी परिसर, गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेस पर्यंत, परेदशी आळी ते अंबर सोसा. पर्यंत, गावदेवी पाडा भाग, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल, दांडेकर हॉस्पिटल ते अच्युत मनोरे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, परदेशी आळी सर्व बैठी घरे. घोडके आळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्या घरापर्यंत, जय भारत नाका ते बैठी घरे पर्यंत जैन मंदिर पर्यंत, आदर्श हॉटेल ते आदित्य कॉम्प्लेक्स पर्यंत मनिष मार्केट, जय भारत नाका ते रतन टॉकीज पर्यंत, त्रिमुर्ती सहनिवास सोसा, मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी, साठे गल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटी पर्यंत, सिटी स्टोअर्स गल्ली, सिनिअर ज्युनिअर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, गायकर गल्ली सर्व बैठी घर, शुभलाभ सोसा ते सहयोग नगर पर्यंत, सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटी पर्यंत, उमा शंकर सोसा. ते यशोवर्धन पर्यंत, आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंट पर्यंत, कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धतपापेश्वर ते मुनोथ नगर पर्यंत, मुनोथ नगर ई विंग, प्रिन्स पॅराडाईज सोसा सनराईज सोसा. केशव सोसायटी, भाऊ पटवर्धन ६'' पाईपलाईन, नवीन प्रभु आळी, हिरवे गुरुजी पुतळा ते वडाच्या झाडापर्यंत, जुनी प्रभु आळी, हारवाला, कुलकर्णी बाजू, मेन व्हॉल, अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींगपर्यंत, गोरखले हॉल ते प्रज्ञा सोसायटी पर्यंत, रचना रेसिडेन्सी सोसा. अष्टविनायक कॉलनी सर्व परिसर, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत, श्री लॉज मे.निलेटा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पर्यंत, यशोपुरम सोसा. आगरी समाज हॉल ते व्हि.के.हायस्कूल पर्यंत, जुने पोस्ट ते डॉ.बुधकर दवाखान्यापर्यंत, अंबिका नगर, इत्यादी.

**२) हरिओम नगर बायपास व ठाणा नाका उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा** :

जानवेकर परिसर, सावरकर चौक ते रतन टॉकीज पर्यंत, अशोक बाग झोपडपट्टी, लोखंडीपाडा, हरि ओम नगर, हरिओम नगर टाकी ते प्रतापनगर पर्यंत, प्रताप नगर ते सुजाता सोसायटी, भाग–१ संघ मित्र सोसायटी, दत्त छाया, पारिजात, साईपार्क, पायोनिअर, सत्यम शिवम सुंदरम, रुपल सोसायटी, बालाजी पद्मावती, समाधान बंगला, भाग २–मार्डन सोसायटी, रिद्धी–सिद्धी सहकार निवास, राजहंस सोसायटी, गुल मोहर, निसर्ग देव, जय माता दी, प्रधान बंगला, सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल, तालुका पोलीस वसाहत, अनुपम सोसायटी पर्यंत, गोविंद गार्डन, गार्डन हॉटेल, शिव सागर हॉटेल, प्रधान बंगला शिवनेकर बंगला व पाटील हॉस्पिटल परिसर, डॉ.बिरमोळे हॉस्पिटल, नंदनवन, कॉस्मो पॉलिटीयन, कनक सरोवर, मधुबन सोसा., स्वप्न रेखा सोसा., साकेत सोसा., पंकज व्हिला, सेलटन सोसा. (उरणकर) मनिषा अपार्टमेंट, गजानन सोसा. एच.ओ.सी. कॉलनी, जलकुंभ ते ठाणा रोड दग्यापर्यंत ५२ बंगला (काही भाग), आनंद सोसायटी व परिसर, उगम नगर परिसर, पवार गल्ली, चॅनल, उपवन, ऑरचिड सोसायटी, लोटस लिली, गोविंद सागर, साईकला, साई विहार, ठाकूर बंगला, साई उद्यान, लामेर सोसा., अप टाऊन रिव्हेन्यू सोसा., साई नगर परिसर, भुसरा पार्क, एकता सोसायटी ते गुरु वाटीका इ. तेरडे बिल्डींग, जलकुंभ ते ठाणा रोड दग्यापर्यंत ५२ बंगला (काही भाग)

**३) भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा** :

कर्नाळा सर्कल ते रुपाली टॉकीज, कर्नाळा सर्कल ते शनि मंदिर ते रोहिदास वाडा, शनि मंदिर ते पंचरत्न हॉटेल ते विश्राळी नाका, पंचरत्न हॉटेल ते डॉ.हळदीपूरकर हॉस्पिटल, शनि मंदिर ते मिरची गल्ली नाका, आशापुरी सोसायटी इत्यादी.

वरील झोन प्रमाणे क्र.१ मध्ये दि.२८/०५/२०२२ रोजी पाणी पुरवठा होईल व झोन क्र.२ मध्ये दि.२९/०५/२०२२ रोजी पाणी पुरवठा होईल. याप्रमाणे पुढे क्रमशः दिवसाआड पाणीपुरवठा होईल.

नागरिकांनी मिळालेले पाणी साठवून ठेवून जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय करू नये व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**सही/–**
**संजय जगताप**
**(शहर अभियंता)**
**पनवेल महानगरपालिका**

# संक्षिप्त...

## कर्जत नगरपरिषदेच्यावतीने महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन



**दै.रायगड नगरी । कर्जत**

आज २५ मे २०२२ महाराणा प्रतापसिंह यांची जयंती त्यानिमित्त कर्जत नगरपरिषदेच्यावतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमेला नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले,

यावेळी नगरसेवक राहुल डाळिंबकर, कार्यालयीन अधिक्षक जितेंद्र गोसावी, मनीष गायकवाड, रवींद्र लाड, अविनाश पवार, रुषिता शिंदे, शेखर लोहकरे, सुदेश गायकवाड, सामिया चौगुले आदी उपस्थित होते.

## घोणसे घाटात सिमेंट ट्रकला भीषण अपघात, चालक गंभीर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पंधरा दिवसाच्या दरम्यान घोणशे घाटात एकाच ठिकाणी तिसरा अपघात झाला असून एकाच ठिकाणी होणारा हा तिसरा अपघात असून या बाबतसंबंधित खात्याकडून योग्य ती खबरदारी घेणे अत्यावश्यक असल्याची चर्चा ऐकावयास मिळते.

पंधरा दिवसापूर्वी एका खाजगी बसला याच ठिकाणी ब्रेक फेल झाल्यामुळे चार जणांचा मृत्यू झाला होता तर सुमारे २० ते २५ जण गंभीर जखमी झाले होते. त्याच ठिकाणी आज दिनांक २४ मे रोजी सिमेंटनी भरलेल्या ट्रकचा उतारातील वळणावर ब्रेक न लागल्याने भीषण अपघात झाला आहे. या अपघातात चालक गंभीर स्वरूपात जखमी झाल्याची घटना घडली आहे.

दिनांक २४ मे रोजी MH 05 -M 3202 या क्रमांकाचा ट्रक तुर्भे येथून अल्ट्राटेक कंपनीचा सिमेंट घेऊन श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली येथे जात होता. हा ट्रक घोणसे घाटातील एक घातक वळणावर आल्यानंतर ट्रकचा ब्रेक फेल होऊन हा अपघात झाला.

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# आदिवासी बांधव आजही 'महाराष्ट्र माझा' म्हणतात हे शासनाच्या कामाचे यश : डॉ. नीलम गोऱ्हे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



महाराष्ट्रातील आदिवासी समाज जागृत आहे. शासकीय अधिकारी काम करीत आहेत. अनेक सामाजिक संघटना आपल्यासाठी काम करत आहेत. साकव सारख्या संस्था चांगले काम करीत आहेत. आदिवासी महाराष्ट्र माझा म्हणतात हे शासनाच्या कामाचे यश आहे. आदिवासींच्या कामाचा लढा अनेक वर्षे सुरू आहे यामुळे त्यांना न्याय मिळण्यास मदत होते आहे. विधवा महिलेची जमीन विकता येत नाही अशा प्रकारचे अनेक निर्णय या आधी झालेले आहेत.

आज तुम्हाला मिळत असलेली जमीन ही तुमचीच आहे. ती आपल्या ताब्यात देताना विशेष आनंद होत आहे. रायगड जिल्हाधिकारी यांच्या वतीने आज पती पत्नी दोघांच्या नावे जमीन होणार असे निर्णय झाले आहेत. हे मुख्यमंत्री ना. श्री. उध्दव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या कामाचे यश आहे. आता आदिवासी बांधवांच्या जमीन मोजणी करून आता पुढील प्रक्रिया पार पडेल. असे प्रतिपादन आज विधान परिषद उपसभापती ना. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी येथे केले.

साकव या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने आदिवासी बांधवांना दळी जमिनीच्या पट्ट्यांच्या वाटपाचा कार्यक्रम आज बर्डावाडी येथे घेण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या. साकव संस्थेचे अरुण शिवकर यांनी, एकत्र दळी जमिनींचे पट्टे आल्याने परस्परांमध्ये वाद निर्माण होतात. वैयक्तिक नाव सातबारावर यावे. रोहयो कामामध्ये जमिनी विकसित करण्यासाठी प्रयत्न व्हावेत. दोन गावांचे आराखडे सादर केले आहेत. त्याला मंजुरी मिळावी. जिल्हा पुनर्वसन समिती स्थापन व्हावी. रोहयो बाबत दर निश्चिती व्हावी, अशा मागण्या मांडल्या.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पाणंद रस्ते आणि इतर कामे रोहयो अंतर्गत घेता येतील. मजुरी वाढविण्याबाबत शासन स्तरावर विचार सुरू आहे. मुख्यमंत्री ना. श्री. उद्धव ठाकरे आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना आपल्या विकासासाठी कटिबद्ध आहे.' मजुरीवर जाणाऱ्या महिलांनी शारीरिक आरोग्याचा विचार केला पाहिजे. शाश्वत विकास उद्दिष्टे गाठण्यासाठी प्रकल्प तयार करण्याच्या सूचना आज जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

या कार्यक्रमाला आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार, तहसिलदार श्रीमती स्वप्नाली डोईफोडे, शीतल म्हात्रे, दीपाली पोटफोडे, किशोर जैन, स्त्री आधार केंद्राच्या प्रमुख विश्वस्त जेहलम जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने महाराष्ट्र माझा आणि जमिनीच्या प्रश्नावर बाजू मांडणाऱ्या गीतांचे सादरीकरण केले.

पुढील बैठक ऑगस्ट २०२२ मध्ये घेणार असल्याचे डॉ.गोऱ्हे यांनी सांगितले. आदिवासी बांधवांच्या मुलांना शिष्यवृत्ती आणि फी भरण्यासाठी यावर्षीपासून संपर्क करण्याचे श्री.किशोर जैन यांच्या संस्थेने आवाहन केले आहे. जमिनीच्या मालकीच्या उताऱ्याची आणि पती पत्नी दोघांच्या फोटो फ्रेम मध्ये घरात लावून ठेवा, अशीही सूचना डॉ.नीलम गोऱ्हे यांनी यावेळी केली.

# नविन पनवेल रेल्वेस्थानक परिसर अतिक्रमणाच्या विळख्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल रेल्वेस्थानक परिसरात सिडकोने तात्पुरत्या स्वरुपात रोज बाजारासाठी मंगलमुर्ती रोज बाजार या संस्थेला जागा उपलब्ध करून दिली आहे. या रोजबाजारामध्ये टपऱ्या बसविलेल्या असून या टपऱ्यापुढे मोठ्या प्रमाणात जागेचे अतिक्रमण करुन बाकडे बसविले आहेत. या टपऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर उघड्यावर खाद्य पदार्थांची विक्री केली जाते. तसेच स्थानिक लोकप्रतिनीधीचे वरदहस्त व अतिक्रमण विभागातील अधिकारी त्यांच्या लागेबांध्यामुळे या परिसरात या फेरीवाल्यांनी येथिल फूटपाथवर कब्जा केला आहे. त्यामुळे पदपथावर चालणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊन येथून चालावे लागते.



नविन पनवेल रेल्वेस्थानका समोर मंगलमुर्ती रोज बाजाराने सर्व फुटपाथ बेकायदेशीर खाद्यपदार्थांचे स्टाल लावून फुटपाथवर कब्जा केला आहे. या खाद्य पदार्थांची सर्व घाण पाणी आजूबाजूच्या गटारात टाकताना दिसत आहेत. यामुळे या परिसरात डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर निर्माण झाला आहे.

या खाद्यपदार्थ विक्रेत्याकडे महापालिकेचा कोणताही परवाना नसताना फूटपाथवर तसेच महावितरण सबस्टेशनच्याजवळ सर्रास गस सिलेंडरचा वापर करुन चायनिस भेळ, इडली सांबर, मिसळपाव, ज्यूस, भेळपूरी, चायनिज,वडापावची विक्री केली जाते. याठिकाणी फूटपाथवर सायंकाळी वडापाव, चायनिज भेळपूरी खाण्यासाठी नागरिक गर्दी करत असून पदपथावर खुर्ची लावलेल्या असतात व पदपथावर कचरा टाकला जातो. कामोठे भोजनालयामध्ये आगीची दुर्घटना घडल्यानंतर महापालिका अधिकारी काही दिवसासाठी जागे झाले होते. त्यानी काही हाटेलवाल्यांना नोटीसा पाठवल्या होत्या. मात्र पुन्हा ये रे माझ्या मागल्या प्रमाणे परिस्थिति निर्माण झाली आहे. जे बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्री करतात यांच्यावर कारवाई होत नसल्यामुळे व्यापारी वर्ग नाराज आहे. यातील बहुतेक टपऱ्या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या असल्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. असे येथील जेष्ठ नागरिक सांगत आहेत.

# लेखी अश्वासनानंतर सामाजिक कार्यकर्ते रवींद्रनाथ ओव्हाळ यांचे आमरण उपोषण स्थगित



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली तहसील कार्यालयातील लेटलतीफ व मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, कार्यालयात बायोमेट्रिक मशीन बसविण्यात यावी तसेच कार्यालयाची स्वच्छता नियमित व्हावी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आणि मोडी लिपी वाचक उपलब्ध करून घ्यावेत या मागण्यांसाठी मंगळवारी (ता.२४) दुपारी सामाजिक कार्यकर्ते रवींद्रनाथ ओव्हाळ हे पाली तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले होते. मंगळवारी (ता.२४) रात्री तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात दिलेल्या लेखी आश्वासनानंतर रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी आपले उपोषण स्थगित केले आहे.

दिलेल्या मुदतीत मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर पुन्हा उपोषण करणार असल्याचा इशारा ओव्हाळ यांनी दिला आहे. सुधागड तालुका हा आदिवासीबहुल तालुका असून सरकारी कामाकरिता नागरिक खेड्यापाड्यातून येत असतात. त्यांना येण्याजाण्यासाठी दळणवळणाची साधने देखील नसतात. शासनाने पाच दिवसांचा आठवडा केला असुन कर्मचाऱ्यांच्या वेळेत देखील बदल केले आहेत. परंतु पाली तहसील व इतर शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी हे बाहेर गावी राहून तेथून येत असल्याने शासनाने नेमून दिलेल्या वेळेवर कामावर पोहचत नाहीत. शिवाय कधी कधी वेळे अगोदर कार्यालयातून निघून जातात. त्यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. त्यांचा वेळ, पैसा व श्रम वाया जातो. त्यामुळे या लेटलतीफांवर कारवाई व्हावी, मुख्यालयी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती मिळावी, कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांसोबत सौजन्याने वागावे, त्यांची कामे वेळेत व्हावीत आदींसह वरील मागण्यांसाठी रवींद्रनाथ ओव्हाळ उपोषणाला बसले होते.

मात्र या मागण्या आगामी काही दिवसांत पूर्ण केल्या जातील अशी लेखी हमी तहसीलदारांनी दिल्यावर उपोषण स्थगित करण्यात आले. यावेळी आरपीआय तालुकाध्यक्ष राहुल सोनावळे, वंचीत बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष अमित गायकवाड, सुधागड तालुका बौद्धजन पंचायत अध्यक्ष भगवान शिंदे, तहसीलदार दिलीप रायण्णावार, नायब तहसीलदार दिलीप कोष्टी, विनोद भोईर, परेश शिंदे, दत्तात्रेय दळवी, गौसखान पठाण, प्रशांत हिंगणे, संदीप सिलीमकर व मंगेश यादव आदींसह कार्यकर्ते व महसूल कर्मचारी उपस्थित होते.

## सुधागड तालुक्यातील माणगाव खुर्द येथे आदिम जमातीचे बहुउद्देशीय संकुल उभारण्यासाठी जागा प्रदान

# एकात्मिक आदिवासी विकास साधणारा प्रकल्प रायगड जिल्ह्यात सर्वप्रथम होत असल्याचा अभिमान : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्याच्या सुधागड तालुक्यातील मौजे माणगांव खुर्द येथील सुमारे १७ हेक्टर गुरचरण जमीन आदिम जमातीच्या बहुउद्देशीय संकुल उभारणीसाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांना प्रदान करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील कातकरी या आदिम जमातीमधील सुमारे ३७ हजारांहून अधिक कुटुंबांचा विकास यामुळे होणार आहे. तसेच जिल्ह्यात मोठ्या संख्येने असलेल्या आदिम जमातीस विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी या बहुउद्देशीय संकुल उभारणीची प्रक्रिया राज्यात सर्वप्रथम रायगड जिल्ह्यात होत असल्याने जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण व गौरवास्पद बाब असल्याने अभिमानाची भावना जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी व्यक्त केली.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबतची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी २०२१ च्या अर्थसंकल्पात केली होती. त्याची अंमलबजावणी होत असताना या प्रकल्पासाठी अनुकूल जागा महसूल विभागाकडून उपलब्ध करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील लोकोपयोगी उपक्रम, शासकीय बांधकामे यासाठी शासकीय जमीन उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. यासाठी पालकमंत्री कु. तटकरे यांनी आभार व्यक्त केले.

आदिम जमातीच्या बहुउद्देशिय संकुलामध्ये इ. १ ली ते १२ वी करीता १ हजार विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा, ५०० मुलांच्या राहण्याची क्षमता असलेले वसतीगृह, ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय, २०० खाटांचे बहुउद्देशीय रुग्णालय, ५०० लोकांच्या क्षमतेचे सभागृह, तंत्रशिक्षण-कौशल्य विकास, १ हजार मे.टन क्षमतेचे साठवणूक गोदाम, २०० कर्मचारी निवासस्थाने, शेती व शेळीपालनासाठी कृषी कौशल्य विकास केंद्र, वनधन प्रक्रिया केंद्र, बागबगीचा-खेळ मैदाने, संरक्षक भिंत, पाणीपुरवठा, विद्युतीकरण, सोलार संयंत्रे, मलनिस्सारण केंद्र, वाहनतळ, संकुलासाठी अंतर्गत रस्ते व इतर सुविधांसह आदिवासी निर्मित वस्तूंचे प्रदर्शन केंद्र अशा विविध सुविधांचा समावेश या बहुउद्देशीय संकुलामध्ये असणार आहे. त्यानुसार मौजे माणगांव खुर्द येथे जिल्ह्यातील आदिम जमातीच्या सर्वांगिण विकासाच्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व बाबींचा विचार करुन आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री कु. तटकरे यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या विविध लोकोपयोगी उपक्रमांमध्ये रायगड जिल्ह्याचा प्राधान्याने विचार करुन शासनाचे सहकार्य लाभत असल्याने समाधान व्यक्त करतांना राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे आभार यानिमित्ताने पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी मानले.

# राज्यात पेट्रोलवर केंद्राच्या करापेक्षा राज्याचा कर दहा रुपये जास्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**




राज्यात पेट्रोलवर केंद्राच्या करापेक्षा राज्याचा कर दहा रुपये जास्त असताना महागाई कोणामुळे आहे, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगितले पाहिजे, असे आव्हान आज भाजपच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनातून देण्यात आले.


लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून जनतेला मोठा दिलासा दिला आणि त्या अनुषंगाने इतर राज्यांनीही कर कमी केला मात्र महाराष्ट्रातील ठाकरे महाविकास आघाडी सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, त्यामुळे इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्र सरकारनेही अमंलबजावणी करावी, यासाठी आंदोलन करण्यात आले. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुका व शहर भाजप कार्यालयाजवळ हे आंदोलन झाले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष के. सी. पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते बी. के. ठाकूर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, चिन्मय समेळ, राजेश पाटील, प्रवीण म्हात्रे, महेंद्र भोईर, गुरुनाथ भोईर, कीर्ती पाटील, संदेश पाटील, आकाश भाटी, संतोष शेळके, यांच्यासह कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

महाराष्ट्रात पेट्रोलवर केंद्र सरकारचा कर १९ रुपये प्रतिलिटर, तर राज्याचा कर २९ रुपये आहे. केंद्र सरकारने पेट्रोल डिझेलवरील कर कमी केल्यामुळे किंमतीत कपात झाली. परिणामी राज्यातील करामुळे मिळणारी रक्कमही आपोआप कमी झाली. तरीही हा दर आपणच कमी केल्याचे महाविकास आघाडी गवगवा करत जनतेची दिशाभूल करीत आहे. ठाकरे महाविकास आघाडीतील नेते महागाईवर बोलत असतात पण आता राज्यात पेट्रोलवर केंद्राच्या करापेक्षा राज्याचा कर दहा रुपये जास्त असताना महागाई कोणामुळे आहे, हे या नेत्यांना सांगता येत नसून राज्यातील पेट्रोल डिझेलची इंधनवाढ केवळ महाविकास आघाडी सरकारमुळे आहे हे स्पष्ट झाले आहे. देशातील अनेक राज्यांनी केंद्राप्रमाणे आपापल्या राज्यातील कर कमी केला आहे, मात्र महाराष्ट्रात सध्या अस्तित्वात असेलेले महाविकास आघाडी सरकार नेहमीप्रमाणे टोमणे शैलीत गुरफटला आहे. त्यामुळे या निष्क्रिय ठाकरे महाविकास आघाडीला जागे करण्यासाठी पुन्हा एकदा आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आलेला आहे.

# सपोनि सुभाष पुजारी यांची मिस्टर एशिया व मिस्टर वर्ल्ड शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय बॉडीबिल्डिंग संघातून निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय बॉडी बिल्डिंग फेडरेशन व हिमाचल प्रदेश बॉडीबिल्डिंग फेडरेशन यांच्यावतीने (पोवंटा साहिब )हिमाचल प्रदेश या ठिकाणी भारतीय बॉडीबिल्डिंग संघ निवड चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी महामार्ग पोलिस यांची ८० किलो वजनी गटामध्ये भारतीय संघात निवड करण्यात आली.




मि.अशिया २०२२ हि स्पर्धा मालदीव या ठिकाणी दि १५ ते २१ जुलै दरम्यान होणार आहे तसेच मि. वर्ल्ड ही स्पर्धा (फुकेत) थायलंड या ठिकाणी ०६ ते १२ डिसेंबर दरम्यान होणार आहे. या स्पर्धे साठी सुभाष पुजारी हे दररोज ५ तास वन अबोव जिम नेरुळ व वाशी या ठिकाणी आंतरराष्ट्रीय खेळाडु मिस्टर युनिव्हर्स सुनीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. यापूर्वी त्यांनी ताश्कंद उझबेकिस्तान या ठिकाणी झालेल्या मिस्टर वर्ल्ड बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये ब्राँझपदक मिळविले होते.तसेच सलग दोनवेळा मास्टर भारतश्री व मास्टर महाराष्ट्र श्री हा किताब सुद्धा त्यांनी मिळवलेला आहे. १मे रोजी पोलीस महासंचालकाचे सन्मान चिन्ह देईन गौरविण्यात आले आहे.

सदरचया निवडी बद्दल त्यांना पत्नी रागिणी पुजारी ,चेतन पाठारे वर्ल्ड बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी तसेच विक्रम रोठे वर्ल्ड बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे लिगल अँडव्हायझर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल पोलिस महासंचालक हेमंत नगराळे, पोलिस महासंचालक डॉ.भूषणकुमार उपाध्याय,विनय कारगांवकर अप्पर पोलिस महासंचालक अनुपकुमार सिंह अप्पर पोलीस महासंचालक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य. डॉ .जय जाधव अप्पर पोलीस आयुक्त नवी मुंबई. संजय जाधव पोलिस अधीक्षक महामार्ग पुणे विभाग.परेश ठाकूर सभागृह नेता पनवेल महापालिका. प्रीतम म्हात्रे विरोधी पक्षनेता पनवेल महापालिका. तसेच पोलीस खात्यातील त्यांचे सहकारी मित्र सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे विशेष अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# कान्होबा ढाबा परिसरात आढळला महिलेचा मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ३०-३५ वयोगटातील महिलेचा मृतदेह पनवेल जवळील कुंडेवहाळ गावाच्या हद्दीतील कान्होबा ढाबा परिसरात आढळून आला असून या संदर्भात पनवेल शहर पोलीस सर्वत्र शोध घेत आहेत.

सदर महिलेचे अंदाजे वय ३०-३५ वर्षे, उंची ५ फूट, मृतदेह लाल पिवळ्या हिरव्या रंगाच्या गोधरीमध्ये गुंडाळलेला, तर दोन्ही पाय पांढऱ्या रंगाच्या चिंधीने बांधलेले, तसेच तिच्या डोक्याचे केस काळे व लांब असून केसांना नारंगी रंगाचा बो आहे,

डोळे नाक व दोन्ही कांन कुजलेले सडलेले आहे, तिच्या अंगात निळ्या - राखाडी रंगाचा टॉप, पांढऱ्या रंगाची ब्रा, फिक्कट गुलाबी रंगाचा पायजमा तसेच पांढऱ्या रंगाच्या चिंधीच्या लांब पट्या आहेत. या महिले बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे, फोन नंबर -०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस निरीक्षक (प्रशासन) दिलीप शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.